**शासकिय पुर्ननियुक्त मा सै संघटनेच्या प्रयत्नातून मंत्रालय मुंबई येथील बैठकीत माजी सैनिकांना नौकरीत विशष संधी**

दि ११ नोव्हेंबर २०२२ रोजी मंत्रालय मुंबई येथे मा. नामदार श्री दीपक केसरकर साहेब शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत मा बाजीरावजी देशमुख, राज्यअध्यक्ष व मंत्रालयीन उपाध्यक्ष श्री उमाकांत भुजबळ साहेब यांनी समन्वय समिती सोबत सहभाग घेतला होता. या बैठकीत शिक्षण क्षेत्रात विविध पदावर माजी सैनिकांना कसे प्राधाण्य देता येईल यावर विस्तृत चर्चा करण्यात आली व खालील काही निर्णय घेण्यात आले आहेत :-

अ माजी सैनिकांना योग्य ते फिजिकल प्रशिक्षण देऊन त्यांना शारीरिक शिक्षक म्हणून सरळ नियुक्ती करण्यात बाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

आ. जे माजी सैनिक टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेले आहेत परंतु टी ई टी परीक्षेची स्वतंत्र मेरिट लिस्ट लागत नसल्या कारणाने त्यांना शिक्षक होण्यापासून अडथळा निर्माण झालेला होता तो दूर करण्यासाठी इतर पदाप्रमाणेच माजी सैनिकांची टी ई टी परीक्षेची स्वतंत्र गुणवत्ता यादी लावण्याचा निर्णय मंत्री महोदयांनी घेतला.

इ. जे पुनर्नियुक्त माजी सैनिक शिक्षण सेवक म्हणून कार्यरत आहेत अशा माजी सैनिकांच्या बाबतीत सकारात्मक विचार करून नियमित वेतनश्रेणी देण्याचे धोरण अल्प कालावधीमध्ये घेण्याचे आश्वासन देण्यात आले.

संतोष मलेवार सरचिटणीस शासकीय पुननिर्युक्त माजी सैनिक संघटना महाराष्ट्र राज्य